|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. २४ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व प्रवेशपूर्व परीक्षेतून सूट प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक निश्चितीच्या प्रक्रियेच्या चौथ्या दिवशी २४ विद्यार्थ्यांना मार्गदर्शक प्राप्त झाले.

आज गणित विषयाच्या १४, संगणकशास्त्र व माहिती आणि तंत्रज्ञानशास्त्र या विषयाच्या १० विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध झाले. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी आज गणितशास्त्र प्रशाळा व संगणकशास्त्र प्रशाळेच्या ठिकाणी सुरु असलेल्या या प्रक्रियेला भेट देवून सविस्तर माहिती घेतली. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी देखील भेट दिली.

उद्या शुक्रवार, दि.२५ मे रोजी या प्रक्रियेचा शेवटचा दिवस असून उद्या वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेच्या विविध विषयांसाठी मार्गदर्शक निश्चितीची प्रक्रिया होणार असल्याची माहिती संशोधन विभागाचे उपकुलसचिव जी.एन.पवार यांनी दिली. सकाळी १० वाजता व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या इमारतीत ही प्रक्रिया होणार आहे.

---

**बातमी क्र.१**

जळगाव दि.२४ ( ) औरंगाबाद येथे होणाऱ्या आव्हान आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ सहभागी होणार असून त्यासाठी गुरुवारी विद्यापीठात पूर्वतयारी शिबीर घेण्यात आले.

या पूर्वतयारी शिबीराचे उद्घाटन कुलसचिव भ.भा.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. २५ मे ते ३ जून या कालावधीत औरंगाबादच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात आव्हान-२०१८ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर होत आहे. या शिबीरात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ९० विद्यार्थ्यांचा संघ सहभागी होणार असून सहा कार्यक्रम अधिकारी देखील जाणार आहेत. याच्या पूर्वतयारीसाठी विद्यापीठात गुरुवारी प्रशिक्षण पूर्वतयारी शिबीर घेण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे, डॉ.दयाधन राणे, डॉ.राजेंद्र जाधव, डॉ.अविनाश निकम, प्रा.साहेब पडलवाल, डॉ.गणपत ढेंबरे, डॉ.पंचशिला वाघमारे, प्रा.हेमंत जोशी, डॉ.ज्योती ढोले, प्रा.भूषण निकम व प्रा.अबोली चंद्राते हे उपस्थित होते. कुलसचिव पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देवून मार्गदर्शन केले. कुणाल मानकर या स्वयंसेवकाने मनोगत व्यक्त केले. दिवसभर चाललेल्या या शिबीरात जिल्हा समन्वयकांनी मार्गदर्शन केले. स्वच्छ भारत उन्हाळी प्रशिक्षण उपक्रमाबाबत प्रा.मनोज पाटील, प्रा.दीपक सोनवणे यांनी माहिती दिली.

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय/२०१८ — दिनांक : २४ मे, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

( डॉ.सुनील पाटील )